# मुख्य कार्यालय, विरार
**विरार (पुर्व),**
**ता. वसई, जि. पालघर, पिन 401 303.**

दुरध्वनी : 0250-2525105/06/2529888/2529890
फॅक्स : 0250-2525107
ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com


**जावक क्र. : व.वि.श.म./ /**
**दिनांक :** २९/०८/२०२५

## वसई विरार महानगरपालिका क्षेत्रात दीड दिवसांच्या गणपतींचे मूर्तींचे विसर्जन उत्साहात, पालिकेच्या कृत्रिम तलावांना नागरिकांचा मोठा प्रतिसाद

वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात गुरुवार दि.२८ ऑगस्ट रोजी दीड दिवसांच्या गणपतींचे विसर्जन मोठ्या जल्लोषात व भावपूर्ण वातावरणात पार पडले. गणेशमूर्ती विसर्जनासाठी महानगरपालिकेने तयार केलेल्या कृत्रिम तलावांना नागरिकांनी चांगला प्रतिसाद दिला. मागील वर्षीच्या तुलनेत मूर्तींचे कृत्रिम तलावात विसर्जनाचे प्रमाण हे वाढल्याचे दिसून आले. यावर्षी दीड दिवसांच्या एकूण १३६८२ गणेशमूर्ती विसर्जनापैकी ११४४८ गणेशमूर्तींचे विसर्जन हे पालिकेच्या कृत्रिम तलावात करण्यात आले. म्हणजेच एकूण ८३% मूर्तींचे विसर्जन हे कृत्रिम तलावात झाले. संपूर्ण विसर्जन प्रक्रिया सुरळीत पार पडली.

मा.आयुक्त श्री.मनोजकुमार सूर्यवंशी (भा.प्र.से.) यांच्या मार्गदर्शनाखाली व अतिरिक्त आयुक्त श्री.संजय हेरवाडे व श्री.दिपक सावंत यांच्या देखरेखीखाली महानगरपालिकेमार्फत यावर्षी मूर्ती विसर्जनासाठी एकूण ११६ कृत्रिम तलाव तयार करण्यात आले असून दोन बंद दगडखाणींच्या ठिकाणी व पाच जेट्टींच्या ठिकाणीही विसर्जनाची सोय करण्यात आली आहे. प्रत्येक प्रभागात २ फिरते हौद याप्रमाणे मूर्ती विसर्जनासाठी ९ प्रभागांमध्ये १८ फिरते हौद उपलब्ध करण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे विसर्जनस्थळी नागरिकांच्या सोयीसाठी मंडप व्यवस्था, आरती स्थळे, दिवाबत्ती सोय, मूर्ती संकलन केंद्र, निर्माल्य कलश, वैद्यकीय मदत कक्ष, इ.आवश्यक सर्व उपाययोजना महानगरपालिकेमार्फत करण्यात आल्या होत्या. शुक्रवारी पहाटे सहापर्यंत गणेशमूर्ती विसर्जन करण्यात आले. यंदाही दगडखाणीतील विसर्जनासाठी कन्व्हेअर बेल्टची सुविधा महापालिकेने उपलब्ध केली होती. कन्व्हेअर बेल्टच्या सहाय्याने विसर्जन करणे अधिक सोयीस्कर ठरले, वेळेची बचत झाली आणि कमी मनुष्यबळात विसर्जन पार पडले. गणेशभक्तांच्या मदतीसाठी महानगरपालिकेचे कर्मचारी, पोलीस विभागाचे कर्मचारी, स्वयंसेवक तैनात ठेवण्यात आले होते.

मा.आयुक्त महोदयांनी स्वतः विसर्जनस्थळी भेट देऊन विसर्जनाच्या नियोजनाची पाहणी केली, तसेच दोन्ही अतिरिक्त आयुक्त, महानगरपालिकेचे सर्व उप-आयुक्त, सर्व सहाय्यक आयुक्त, विभागप्रमुख, अग्निशमन कर्मचारी आणि इतर कर्मचारी वर्ग प्रभागनिहाय विसर्जन स्थळी हजर राहून विसर्जन प्रक्रिया व्यवस्थितरित्या पार पाडण्यासाठी प्रयत्न करीत होते.

शहरात ठिकठिकाणी कृत्रिम तलाव उभारल्यामुळे व विसर्जनस्थळी महानगरपालिकेने सर्व सोयी सुविधा उपलब्ध करून दिल्यामुळे नागरिकांना निर्विघ्नपणे बाप्पांचे विसर्जन करता आले. यासाठी गणेशभक्तांनी व नागरिकांनी प्रशासनाचे आभार मानले आहेत.

पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करून पर्यावरणाची हानी रोखण्यासाठी महानगरपालिकेने मूर्ती विसर्जनासाठी विविध सोयी सुविधा नागरिकांसाठी उपलब्ध करून दिल्या आहेत. महानगरपालिकेच्या या उपक्रमाला उत्तम प्रतिसाद देत शहरात पर्यावरण पूरक गणेशोत्सव साजरा करणेत नागरिकांकडून महानगरपालिकेला मोठे सहकार्य मिळत आहे. यावर्षीच्या विसर्जनात शाडू मातीच्या मूर्तींचे प्रमाण मोठ्या प्रमाणात दिसून आले.

पर्यावरण पूरक गणेशोत्सव साजरा करणेसाठी व मा.न्यायालयाच्या आदेशाचे पालन करून येणाऱ्या पाच दिवसीय, सात दिवसीय, गौरी विसर्जन आणि अनंत चतुर्दशी आदी विसर्जनावेळी नागरिकांनी कृत्रिम तलावांना प्राधान्य द्यावे

आणि निसर्गाची हानी टाळावी असे आवाहन महापालिकेचे आयुक्त मा.श्री.मनोजकुमार सूर्यवंशी यांनी केले आहे.

दिड दिवसांच्या गणपतीचे विसर्जन २०२५
कृत्रिम तलाव
घरगुती – ११३९३
सार्वजनिक – ५५
एकूण – ११४४८

नैसर्गिक स्त्रोत्र, जेटी
घरगुती – २२०१
सार्वजनिक - ३३
एकूण – २२३४